




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# सरकारी कर्मचाऱ्यांचे घरभाडे वाढले

## निवासस्थान सेवाशुल्कात दुपटीने वाढ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेली वाढ तसेच निवासस्थानांच्या सुविधा पुरविण्यासाठी लागणाऱ्या खर्चात झालेली वाढ लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थान सेवाशुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार सध्या सरकारी कर्मचाऱ्यांना भराव्या लागणाऱ्या निवासस्थान सेवाशुल्कात दुपटीने वाढ करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी आणि घराच्या क्षेत्रफळानुसार ही वाढ करण्यात आली असून १ फेब्रुवारी २०२३ पासून ही वाढ वसूल केली जाणार आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना निवासस्थाने पुरविण्यासाठी जास्त खर्च येत असला तरी सेवाशुल्काची आकारणी मर्यादित ठेवण्यात आली होती. मात्र दनंदिन उपयोगाच्या वास्तूच्या किमती व देखभाल खर्च, वीज दर, जल दर, नगरपालिका कर/महापालिका कर व कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सातव्या वेतन आयोगानुसार झालेली लक्षणीय वाढ विचारात घेऊन सेवाशुल्काच्या दरात वाढ करण्याचा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काढण्यात आला आहे. यानुसार सध्या



असलेल्या निवासस्थान शुल्कात दुपटीने वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासकीय निवासस्थान क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या निवासस्थानात वास्तव्य करीत असल्यास अतिरिक्त सेवाशुल्कही आकरण्यात येणार आहे.

१ फेब्रुवारी २०२३ पासून सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनसंरचनेनुसार सेवाशुल्क वसूल करण्यात येणार आहे. वेतन स्तरानुसार आणि क्षेत्रफळानुसार हे सेवाशुल्क आकारण्यात येणार आहे. २२० चौरस फुटांसाठी २२० रुपये, २२१ ते ३२० चौरसफुटासाठी २७० रुपये, ३२१ ते ४२० चौरस फुटासाठी ३७० रुपये, ४२१ ते ५५० चौरसफुटांसाठी ४९० रुपये, ५५१ ते ७५० चौरस फुटांसाठी ६५० रुपये, ७५१ ते १११० व त्याहून अधिक चौरसफुटांसाठी ९३० रुपये सेवाशुल्क आकारण्यात येणार आहे.

फेब्रुवारी २०२३ पासून हे अतिरिक्त सेवा शुल्क लागू करण्यात आले असून त्याची वसुली वेतनातून ३ हप्त्यांत करण्यात येणार आहे.

### अतिरिक्त सुविधांसाठी अतिरिक्त दर

अति महत्त्वाच्या व्यक्ती/ अधिकारी वर्गाकरिता देण्यात येत असलेल्या अतिरिक्त सुविधांसाठी अतिरिक्त दर आकारण्यात येणार आहे. पोलीस, लिफ्ट, लिफ्टमन, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कामगार इत्यादी सुविधांचा यासमध्ये समावेश असून हे अतिरिक्त शुल्क आकरण्याचे अधिकारी कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले आहेत. यापुढे दरवर्षी सेवाशुल्कात वाढ करण्यात येणार असून याविषयीचे आदेश दरवर्षी काढण्यात येणार आहेत.

## थोडक्यात...

### शिष्यवृत्ती परीक्षा जुलैमध्ये घ्या!

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** प्राथमिक (इयत्ता चौथी) व उच्च प्राथमिक (इयत्ता सातवी) शिष्यवृत्ती परीक्षा 26 एप्रिल रोजी घेण्याचे शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. मात्र एप्रिलमध्ये इतर वर्गांच्या वार्षिक परीक्षा, निकाल प्रक्रिया आणि प्रशासकीय कामांची लगबग सुरू असते, त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांवर अतिरिक्त ताण येण्याची शक्यता आहे. तसेच एप्रिलमध्ये उन्हाचा तडाखा वाढत असल्याने अनेक कुटुंब बाहेरगावी जाण्याचे नियोजन करतात. परिणामी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सलग व नियोजनबद्ध वेळ मिळणे कठीण होते. त्यामुळे यंदा नव्या निर्णयानुसार घेण्यात येणारी इयत्ता चौथी व इयत्ता सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा एप्रिलऐवजी जुलैमध्ये घेण्यात यावी, अशी मागणी पालक व शिक्षकांकडून करण्यात येत आहे. शालेय शिक्षण विभागाकडून नुकतीच इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. पाचवी आणि आठवीच्या परीक्षेचे हे शेवटचे वर्ष आहे. यावर्षीपासून पुन्हा इयत्ता चौथी व इयत्ता सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार इयत्ता चौथी व इयत्ता सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा 26 एप्रिल रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

### वैद्यकीय देयकांचा निपटारा 'महाकर्मी' संकेतस्थळाद्वारे

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** आरोग्य प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'महाकर्मी वैद्यकीय देयक दावा संकेतस्थळ', तसेच राज्यातील वैद्यकीय मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक सक्षम करणाऱ्या 'वैद्यकीय अधिकारी व्यवस्थापन यंत्रणा' या संकेतस्थळाचा शुभारंभ सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आला.

# डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचा भारताला पुन्हा झटका


## सोलर सेल आणि पॅनल्सवर लादले १२६ टक्के आयात शुल्क

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारत, इंडोनेशिया आणि लाओस येथून आयात होणाऱ्या सोलर सेल आणि पॅनल्सवर अमेरिकेने मोठ्या प्रमाणात काउंटरव्हेलिंग ड्यटी (प्रतिसंतुलन शुल्क) लादल्या आहेत. या तीन देशांमधील कंपन्या त्यांच्या सरकारांकडून अनुदान मिळवत आहेत, ज्यामुळे त्यांना कमी किमतीत अमेरिकेत वस्तू विकता येत आहेत. त्यामुळे अमेरिकन कंपन्यांचे नुकसान होत आहे, असा अमेरिकन सरकारचा युक्तिवाद आहे. त्यामुळे या ड्यटी लादण्यात आल्या आहेत. अमेरिकेच्या वाणिज्य विभागाने हा निर्णय घेतला आहे आणि असे म्हटले आहे की या देशांमधील उत्पादकांना मिळत असलेल्या सरकारी पाठिंब्यामुळे अमेरिकन उत्पादक स्पर्धात्मक तोट्यात आले आहेत. अमेरिकेने या तीन देशांवर खूप मोठ्या प्रमाणात काउंटरव्हेलिंग ड्यटी लादले आहे. भारतातील सौरऊर्जेवरील एकूण काउंटरव्हेलिंग ड्यटी १२५.८७ टक्के आहे, तर इंडोनेशियासाठी हा दर १०४.३८ टक्के आणि लाओससाठी ८०.६७ टक्के आहे.

यामध्ये काही कंपन्यांसाठीचे काउंटरव्हेलिंग ड्यटीचे दर देखील वेगवेगळे आहेत, जसे की भारतातील मुंद्रा सोलरसाठी १२५.८७ टक्के, इंडोनेशियातील पीटी ब्लू स्काय सोलरसाठी १४३.३ टक्के, पीटी आरईसी सोलर एनर्जीसाठी ८५.९९ टक्के आणि लाओसमधील सोलरस्पेस टेक्नॉलॉजी आणि व्हिएतनाम सनर्जीसाठी ८०.६७ टक्के. फर्स्ट सोलर, हानव्हा क्यूसेल्स आणि मिशन सोलरसह अनेक अमेरिकन सोलर कंपन्यांनी गेल्या वर्षी याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यांचा आरोप आहे की स्वस्त आयातीमुळे अमेरिकेतील नवीन प्लांटमध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती धोक्यात येत आहे.

काउंटरवेलिंग ड्यटीचा अर्थ असा आहे की अनुदानाचा (सबसिडीचा) परिणाम संपवण्यासाठी लादलेला अतिरिक्त कर. जेणेकरून देशांतर्गत कंपन्या न्याय्य पद्धतीने स्पर्धा करू शकतील. हा प्राथमिक कर आहे, म्हणजेच सुरुवातीचा निर्णय आहे. या कंपन्या उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीत विक्री करत आहेत की नाही यावर मार्चमध्ये



पुढील निर्णय घेतला जाईल. गेल्या वर्षी २०२५ मध्ये, या तीन देशांमधून अमेरिकेत सौरऊर्जा उपकरणांची आयात अंदाजे ४.५ अब्ज डॉलर्स इतकी होती, जी एकूण आयातीच्या जवळजवळ दोन तृतीयांश होती.

# रस्ते अपघात रोखण्यासाठी शासनाचा सर्वकष आराखडा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

रस्ते अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. परिवहन व वाहतूक अधिकारी वाहनांवर कारवाई करीत आहेत. परदेशात वाहनांसाठी विविध मार्गदर्शक तत्वे आहेत. दिशादर्शक फलक जागोजागी लावले जातात. परिवहन विभाग राज्यातील सर्व रस्त्यांचा एक आराखडा तयार करीत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत दिली. जानेवारीत समृध्दी मार्गावर मुंबईहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या स्लीपर बसचा अपघात झाला. एक जुलै २०२३ मध्ये सिंदखेडराजा येथे स्लीपर बस मधील २५ प्रवाशांचा मृत्यू झाला. त्याच वर्षी स्लीपर बस मध्ये १२ प्रवाशी होरपळून मृत्यूमुखी पडले. स्लीपर बस


परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माहिती

मध्ये अनेक त्रुटी आहेत. परदेशात स्लीपर बसवर बंदी असताना राज्यात त्या का धावत आहेत अशी लक्षवेधी धनंजय मुंडे यांनी मांडली. या लक्षवेधीच्या चर्चेत आदित्य ठाकरे, जयंत पाटील यांनी भाग घेतला. राज्यातील रस्त्यांवर स्लीपर बस सुसाट धावत आहेत. त्यांना कसले नियम लागू आहेत की नाही ते दिसत नाही असे ठाकरे यांनी सांगितले.

# अजित पवार विमान अपघात प्रकरणात DGCA ची मोठी कारवाई!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघातात निधन झाले. यानंतर आता नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) या अपघात प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. डीजीसीएने व्हीएसआर व्हेंचर्स या विमान कंपनीची चार विमाने ग्राउंड करण्याचे आदेश दिले आहेत. अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर या कंपनीचे विशेष सुरक्षा ऑडिट करण्याचे निर्देश देण्यात आले होते. या ऑडिटमध्ये समोर आलेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळापासून काही अंतरावर झालेल्या लिअरजेट ४५ या विमानाच्या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता.


अजित पवार विमान अपघात प्रकरणात DGCA ची मोठी कारवाई! व्हीएसआर व्हेंचर्सची ४ विमाने केली ग्राउंड

दरम्यान या ऑडिट पथकाला सुरक्षा नियमांचे अनेक उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहेत. या पार्श्वभूमीवर, मंगळवारी ठराविक नोंदणी क्रमांक असलेली लिअरजेट ४०/४५ (Learjet 40/45) विमाने ग्राउंड करण्याचे आदेश डीजीसीएकडून देण्यात आले आहेत.

# राज्यातील २५५ शाळा बंद झाल्याची माहिती : खा. सुप्रिया सुळे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मराठी शाळांबाबत महाराष्ट्र सरकारने जी माहिती दिली त्याबाबत आता सुप्रिया सुळे यांनी पोस्ट लिहिली आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे पण शिक्षणाच्या परिघातून मराठी भाषा हळूहळू दूर होत चालली आहे असं म्हणत सुप्रिया सुळेंनी खंत व्यक्त केली आहे. राज्यात कमी पटसंख्येमुळे २ हजार मराठी शाळा अडचणीत आल्या असून त्यापैकी ६२० शाळा बंद होणार असल्याने २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. कोकण विभागात ७००, विदर्भात ८०० हून अधिक, पश्चिम महाराष्ट्रात ७०० हून अधिक, मराठवाड्यात ४००, उत्तर महाराष्ट्रात ३०० हून अधिक मराठी शाळा बंद होण्याच्या स्थितीत आहेत. डिसेंबर २०२५ मध्ये ६२० मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचा परिणाम म्हणून ७० गावांमध्ये ना शाळा, ना पाटी पेन्सिल



अशी स्थिती निर्माण झाली आहे. मराठी शाळा वाचवण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिक्षक, विद्यार्थी आणि संस्था चालकांनी लाखोंच्या संख्येने मोर्चा काढून महाराष्ट्र शासनास निवेदन सादर केलं आहे. या सगळ्यावर कुठली कार्यवाही किंवा उपाययोजना करण्यात आली आली आहे किंवा येणार आहे? नसल्यास कारणं काय त्याची माहिती द्यावी महाराष्ट्रातील पालकांचा कल इंग्रजी शाळांकडे वाढत असल्याने मराठी शाळा बंद पडत असल्याची स्थिती असल्याचे शासनाने सभागृहात कबूल केले. राज्यातील तब्बल २५५ शाळा मागील दोन वर्षांत बंद पडल्या आहेत. महाराष्ट्रातच मराठी भाषेच्या शाळांची ही स्थिती होणे अतिशय गंभीर आणि खेदजनक आहे. एकीकडे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तर दुसरीकडे शिक्षणाच्या परिघातून मराठी भाषा हळूहळू दूर होतेय असे चित्र दिसते. अभिजात भाषेच्या विकासासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणारा निधी मराठी भाषेतून शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी वापरता येऊ शकतो. शासनाने याबाबत गांभीर्याने विचार करुन मराठीतून शिक्षण अधिकाधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी काम करावे. मराठी भाषेची पताका फडकवत ठेवण्यासाठी हे आवश्यक आहे. दरम्यान याबाबत मंत्री दादा भुसे यांनी असं उत्तर दिलं आहे की विचारण्यात आलेली माहिती अंशतः खरी आहे. पण मराठी शाळा बंद करण्याचा कुठलाही निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला नाही. सिंधुदुर्गात मोर्चा काढण्यात आल्याची बाबही खरी आहे असंही उत्तर भुसे यांनी दिलं आहे. पालकांचा कल इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये पाल्यांचा प्रवेश घेण्यासाठी वाढत असल्याने मागील दोन वर्षांच्या तुलनेत कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र भागातील २५५ मराठी शाळा बंद झाल्या आहेत.

# वर्षभरात ४८ हजार महिला, मुली बेपत्ता

## १३ हजार अल्पवयीन मुली आणि महिलांचा अद्याप शोध नाही

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात गेल्या वर्षभरात तब्बल ४८ हजार २७८ अल्पवयीन महिला व मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक बाब समोर आली असून १३ हजार अल्पवयीन मुली आणि महिलांचा अद्याप शोध लागलेला नसल्याची माहिती राज्य सरकारने मंगळवारी विधानसभेत दिली. राज्यात विशेषत: मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर, छतपती संभाजीनगर आदी शहरांमध्ये मोठ्याप्रमाणात अल्पवयीन मुली बेपत्ता होत असल्याबाबत मंगेश कुडाळकर, प्रशांत ठाकूर आदी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात गृह विभागाने ही माहिती दिली. राज्यात सन२०२५मध्ये हरवलेल्या ४८ हजार २७८ महिलांपैकी ३६ हजार ५८१ महिलांचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले. तर अजूनही ११ हजार ६९७ महिलांचा शोध लागलेला नाही. अशाच प्रकारे हरवलेल्या १२ हजार ११३ अल्पवयीन मुलींपैकी १० हजार २९५ महिलांचा शोध लागला असून १८१८ मुली अद्याप बेपत्ता आहेत. विशेष म्हणजे सन २०२४ मधील हरवलेल्या ४५ हजार ६६२ महिला आणि अल्पवयीन मुलींच्या विचार करता गेल्या वर्षभरात



हरवलेल्या महिला- अल्पवयीन मुलींची संख्या अधिक आहे. मुंबईतून हरवलेल्या ४ हजार ५१५ अल्पवयीन मुले-मुलींपैकी ४ हजार ४५५ मुलांचा मुले-मुलींचा शोध लागला आहे. बेपत्ता व शोषित शोध घेऊन त्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यासाठी राज्यात २० जानेवारीपासून ऑपरेशन मुस्कान सुरु करण्यात आले हरविलेल्या मुलांचा शोध घेण्यात येत आहे.

# मराठी भाषेचा अभिजात दर्जा कागदावरच!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

केंद्र सरकारने १५ महिन्यांपूर्वी मराठी भाषेला दिलेला 'अभिजात दर्जा' केवळ कागदावर आहे. स्वतंत्र 'उत्कृष्ट अध्ययन केंद्र' (एक्सलेंन्स सेंटर) स्थापन न झाल्याने केंद्राकडून राज्याला मराठी भाषा संवर्धन आणि संरक्षणासाठी आतापर्यंत एक छदामही मिळालेला नाही. अभिजात दर्जा देण्यात आलेल्या देशातील भाषांसाठी केंद्राने २० वर्षापूर्वी धोरण तयार केले. त्यात सुधारणा करण्याच्या सबबीखाली राज्य सरकारने पाठवलेला उत्कृष्टता केंद्र प्रस्ताव केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे पडून आहे. सुधारणा होत नाही तोपर्यंत निधी नाही. त्यामुळे हा निधी कधी मिळेल, हे गुलदस्त्यात आहे. प्राचीन परंपरा, संस्कृती आणि साहित्यनिर्मिती असलेल्या मराठी



भाषेला राज्य सरकारच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नानंतर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्राने अभिजात दर्जा जाहीर केला. केंद्र सरकारने यापूर्वी तमिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम, ओडिया (पान ९ वर) (पान १ वरून) आणि १५ महिन्यापूर्वी मराठी बरोबर पाली, प्राकृत. असामिया आणि बंगला अशा ११ भाषांना अभिजात दर्जा देण्यात आलेला आहे.

अभिजात दर्जा मिळालेल्या भाषेच्या संवर्धन, संशोधन आणि संपादनासाठी केंद्राकडून सादर केलेल्या प्रकल्पानुसार निधी दिला जातो. यापूर्वी अभिजात दर्जा मिळालेल्या भाषांसाठी एकच उत्कृष्ट अध्ययन केंद्र म्हैसूरमध्ये केंद्रीय भारतीय भाषा संस्था (सीआयआयएल) नावाने स्थापन करण्यात आले. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर राज्य सरकारने पहिल्यांदा मुंबईत स्वतंत्र असे उत्कृष्टता अध्ययन केंद्र स्थापन करण्याची परवानगी मागणारा प्रस्ताव केंद्राकडे सादर केला. हा निधी मिळावा, यासाठी राज्य सरकारच्या भाषा विभागातील उच्च अधिकाऱ्यांनी दोन वेळा दिल्लीवारी केली.

# भाजपकडून नव्या पदाधिकाऱ्यांची नेमणूक

## डॉ. सुजय विखे पाटील यांना मोठी जबाबदारी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील राजकारणात महत्त्वाची घडामोड घडत भाजपने आपल्या नव्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा केली आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर जाहीर झालेल्या या यादीत अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, नगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी निवड करत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना थेट प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मुंबईतून नव्या कार्यकारिणीची घोषणा केली. या घोषणेत डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह इतर दहा जणांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. विधानसभा, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांदरम्यान त्यांनी केलेल्या संघटनात्मक कामाची आणि पक्षविस्तारासाठी घेतलेल्या मेहनतीची दखल या निवडीमधून घेतल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. नगर जिल्ह्यातून थेट राज्य संघटनेत एवढ्या उच्च पदावर वर्णी लागण्याची ही पहिलीच वेळ असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. स्वतः डॉ. विखे पाटील यांनीही या जबाबदारीला संधी मानत राज्यभर पक्षवाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने या नव्या कार्यकारिणीला मान्यता देताना २०२९ मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. संघटनात्मक बळकटी, नव्या नेतृत्वाला वाव आणि विविध सामाजिक घटकांपर्यंत पोहोच वाढवणे या उद्दिष्टांवर भर देण्यात आला आहे. नव्या चेहऱ्यांना दिलेली संधी ही आगामी राजकीय रणनीतीचा भाग मानली जात आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह खालील नेत्यांना प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

गोपीचंद पडळकर, चेतन देशमुख, अतुल कासेकर, भारती पवार, संजय कोडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्याय, प्रवीण पोटे आणि अर्चना चाकोरकर.

सरचिटणीस पदावर निरंजन डावखरे, योगेश क्षिरसागर, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे आणि सुनील राणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चिटणीस म्हणून प्रशांत ठाकूर, मंगेश चव्हाण, परिणय, वर्षा ढहाळे, संजय जगताप, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रवीण घुगे, रेखा कुलकर्णी आणि भैरवी वाघ यांची निवड झाली आहे. कोषाध्यक्षपदी मिहिर कोटेचा, सहकोषाध्यक्ष म्हणून लखानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्य प्रवक्तेपदी नवनाथ बन, युवा मोर्चा अध्यक्षपदी कृष्णराज महाडिक तर महिला मोर्चा अध्यक्षा म्हणून चित्रा वाघ यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

### राजकीय समीकरणांमध्ये नवा अध्याय

या नव्या नियुक्त्यांमुळे भाजपच्या राज्य संघटनेत ताजेपणा आणि नवे नेतृत्व समोर आले आहे. जिल्हा ते राज्य असा प्रवास करत नेतृत्वाला मिळालेली संधी ही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी मानली जात आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक शिस्त, विस्तार आणि प्रभावी जनसंपर्क यावर भर देत पक्ष पुढील वाटचाल करणार असल्याचे संकेत या घोषणेतून मिळत आहेत.

# विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी, छडी नाही तर शिक्षकांची गोडी महत्त्वाची

**मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

आजच्या डिजिटल युगात शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवायची असेल तर छडी चा वापर न करता गोडीने विद्यार्थ्यांना जवळ घेऊन त्यांची गुणवत्ता वाढवली जात असल्याचे वास्तव मुरबाड तालुक्यातील साकुर्ली या शाळेचे शिक्षक तुळशीराम भोईर यांचे माध्यमातून होत असल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून पालक वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील साकुर्ली हे छोटेसे गाव असुन त्या गावात त्या गावात सर्व समाजाचे वास्तव्य आहे. इयत्ता चौथी पर्यंत असलेल्या या शाळेची पटसंख्या २७ आहे. परंतु बहुतेक विद्यार्थी हे आदिवासी समाजाचे असल्याने ते रोजगारासाठी नेहमीच स्थलांतरीत होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असते.हे नुकसान टाळण्यासाठी शाळेचे शिक्षक तुळशीराम भोईर व नामदेव घिगे यांनी या आदिवासी बांधवांना एकत्र घेऊन तुम्ही पोटाची खळगी भरण्यासाठी नेहमीच स्थलांतरित होता.. आणि मुलांना सोबत घेऊन जाता , त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असुन त्यांना शिक्षण दिले तर भविष्यात तुम्हाला काबाडकष्ट करण्याची गरज पडणार नाही. याबाबत त्यांना आदिवासी पालकांना प्रबोधित केले.आणि त्यांचे स्थलांतर रोखले.दरम्यान शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची जात न पाहता त्याची गुणवत्ता पाहणारे शिक्षक म्हणतात की जर हे विद्यार्थी शाळेत नसते तर आम्हीला नोकरीची संधी मिळाली नसती.नोकरी नसती तर आम्हाला देखील या आदिवासी पालका प्रमाणे कुठे तरी रोजगार शोधावा लागला असता,याचा प्रामुख्याने विचार करत गरिब श्रीमंत असा भेदभाव न करता केवळ गुणवत्ता कशी वाढेल यासाठी छडीचा वापर न करता त्यांना गोडीने घ्या.त्यांना आवड निर्माण होईल व शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.याचे वास्तव लोकमतने समोर आणले आहे.




# नगर–दौंड महामार्गावर भीषण अपघात

- एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

दौंड महामार्गावरील कोळगाव शिवारात गेल्या दि. २४ रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास ट्रक आणि मारुती इको या दोन वाहनांच्या भीषण अपघातात इको गाडीतील चालकासह इतर तिघांचा मृत्यू झाला. या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला आहे. इको गाडीचा चालक नितीन कोकाटे (रा. काष्टी, वय- २२), गजानन जनार्धन पायघन (वय- ४७), दुर्पा गजानन पायघन (वय -३६),वैभव गजानन पायघन (वय- १९)या अशी मय तांची नावे आहेत. करण गजानन पायघन (वय-१३) हा मुलगा गंभीर जखमी असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.पायघन कुटुंबीय हे अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील मळतूर येथील मुळ राहणारे आहेत. कामानिमित्त ते सध्या श्रीगोंदा तालुक्यातील चिंभळे गावात राहत होते. काष्टी येथील चालक नितीन कोकाटे यांना घेऊन ते गावी गेले होते. रात्रीच (२३) ते चिंभळे येथे जाण्यासाठी ते निघाले होते.) कोळगाव शिवारातील माऊली मंदिर परिसरात त्यांची गाडी आल्यानंतर दौंड हून नगरकडे जाणाऱ्या ट्रकने जोराची धडक दिली. धडक एवढी जोराची होती की इको गाडीतील चौघांचा मृत्यू झाला.



अपघाताची माहिती समजताच बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, दादासाहेब क्षीरसागर यांच्यासह इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. गाडीत अडकून पडलेले मृतदेह बाहेर काढले.चारही जणांचे मृतदेह शव विच्छेदनासाठी श्रीगोंदा येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात फिर्याद तक्रार दाखल करण्याचे काम सुरू आहे.

# वैष्णवी विजय कवडे CSIR-NET-JRF परीक्षा उत्तीर्ण

**डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)**

महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महा. गणोरे चे प्राचार्य श्री. कवडे सर यांची कन्या वैष्णवी विजय कवडे CSIR-NET-JRF परीक्षा उत्तीर्ण NTA द्वारा घेतल्या जाणाऱ्या csir net. Jrf परीक्षेत केमिकल सायन्स मध्ये वैष्णवी कवडे ऑल इंडिया रँक -79 मिळवून उत्तीर्ण झाली आहे. ही भारत सरकारची राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा आहे. या यशामुळे तिला पी. एच. डी. साठी सरकार कडून शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशाबद्दल तिचे संगमनेर महाविद्यालय, महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय यांच्या कडून विशेष अभिनंदन.

# पुण्यात 'Oslo: A Tail of Promise' चित्रपटाचा भव्य प्रीमियर

## IFFI नंतर प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

गोव्यात गेल्या नोव्हेंबरमध्ये पार पडलेल्या International Film Festival of India (IFFI) च्या ५६व्या आवृत्तीत भावनिक प्रतिसाद मिळाल्यानंतर Oslo: A Tail of Promise या चित्रपटाचा पुण्यात शनिवारी भव्य प्रीमियर झाला. या सोहळ्याला चित्रपटातील कलाकार, तांत्रिक टीम तसेच सादरकर्ते आणि निर्माता जॉन अब्राहम उपस्थित होते.

खऱ्या घटनांवर आणि वास्तव अनुभवांवर आधारित हा नॉन-फिक्शन चित्रपट माणूस, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील नात्याचा भावनिक प्रवास मांडतो. जखमी भूतकाळ असलेला सायबेरियन हस्की 'ओस्लो' आणि स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेत असलेली पूजा यांच्यात निर्माण होणाऱ्या




नात्यातून प्रेम, जिद्द आणि परस्पर उपचारांची प्रभावी कथा उलगडते. प्राणी आणि माणूस यांच्यातील सहअस्तित्वाचा संदेश देत हा चित्रपट निसर्गाशी असलेल्या मानवी नात्याला अधोरेखित करतो.

चित्रपटात Protecterra Ecological Foundation च्या संस्थापिका पूजा आर. भाले आणि 'ओस्लो' यांच्यातील अतूट नातं केंद्रस्थानी आहे. समाजाच्या चौकटींपलीकडे जाऊन निसर्गासोबत जगण्याचा त्यांचा प्रवास या चित्रपटातून संवेदनशीलपणे मांडण्यात आला आहे.

निर्माते जॉन अब्राहम यांनी सांगितले की, "प्राणी आपल्याला शिकवण्यासाठी असतात. ओस्लो आणि पूजामधील नातं करुणा आणि सहजीवनाची जाणीव करून देतं."

निर्माते अमेय गोसावी यांच्या मते, हा चित्रपट स्त्रीच्या सामर्थ्याचा वेगळ्या दृष्टिकोनातून घेतलेला वेध आहे. दिग्दर्शिका इशा पुंगलिया यांनी चित्रपट वास्तवाशी प्रामाणिक ठेवत भावनिक सत्याला प्राधान्य दिले आहे. "निसर्गाशी आणि भाषेपलीकडील नात्यांशी संवाद साधणारी ही कथा आहे," असे त्या म्हणाल्या.

JA Entertainment, Protecterra Ecological Foundation आणि Vaanar Nirmit यांच्या संयुक्त विद्यमाने निर्मित हा चित्रपट मानवी संवेदना, करुणा आणि सहअस्तित्वाचा प्रभावी संदेश देणारा ठरत आहे.

# अहिल्यानगर झेडपी, पंचायत समिती निवडणूका थेट पुढच्या वर्षी




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानुसार राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यातील अनेक वर्षांपासून रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका आता पुन्हा एकदा अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडल्या आहेत. या निर्णयामुळे नगरसह जिल्हा परिषदेसह २० जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका वर्षभर लांबणीवर पडण्याची शक्यता असून त्या पुढील वर्षी होतील अशी चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान येत्या १ एप्रिलपासून जनगणना सुरू होत आहे. ही जनगणना ३० सप्टेंबर पर्यंत सुरू राहील. त्यानंतर तीन महिन्यांनी याचा अहवाल सादर होईल. लोकसंख्येचा हा डाटा तयार झाल्यानंतर तो न्यायालयात सादर केला जाईल त्यानंतर यावर निवडणुकांचा निर्णय होऊ शकतो असे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. दरम्यान, या निर्णयाने जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीची वाट पाहणाऱ्या इच्छूकांना आणि राजकीय पक्षांना धक्का बसला आहे. महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची राज्य सरकारने केलेली मागणी फेटाळून लावली. न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे. त्यामुळे जोपर्यंत आरक्षणाच्या कायदेशीर प्रश्नावर ठोस तोडगा निघत नाही, तोपर्यंत निवडणुका घेणे उचित ठरणार नाही, असे स्पष्ट मत न्यायालयाने व्यक्त केले आहे. तसेच ओबीसींच्या राजकीय आरक्षणावर लवकरच अंतिम सुनावणीला सुरुवात होणार असल्याचं सुप्रीम कोर्टानं सांगितलं आहे. अंतिम सुनावणी लवकर घेऊ अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयानं घेतली आहे. अंतिम सुनावणी पूर्वतयारी पूर्ण करण्याचे सर्व वकिलांना निर्देश सुप्रीम कोर्टानं दिले आहे. याबाबतची सुनावणीच्या तारखेबाबत दोन दिवसांत निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले. या निर्णयामुळे नगरसह जिल्हा परिषदेसह २० जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका वर्षभर लांबणीवर पडण्याची शक्यता असून त्या पुढील वर्षी होतील असे बोलले जात आहे. येत्या एक एप्रिल पासून जनगणना सुरू होत आहे. ही जनगणना ३० सप्टेंबर पर्यंत सुरू राहील. त्यानंतर तीन महिन्यांनी याचा अहवाल सादर होईल.

# रोहिणी थोरात यांना पुरस्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात नुकताच यांना छबूबाई नगरकर लोककलावंत पुरस्कार निमगाव वाघा येथे पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी ॲड. भूषण बऱ्हाटे ,पोलीस उपनिरीक्षक तथा राष्ट्रपती पोलीस पदक विजेते रतीलाल चौधर,सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, अभिनेत्री गौरी रत्नपारखी नाना डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. रोहिणी सुभाष थोरात (सांगवीकर) या लावणी साम्रानी असून त्यांना आतापर्यन्त अनेक पुरस्कार मिळालेले आहे त्यामध्ये अहमदनगर लावणी महोत्सव- प्रथम क्रमांक ,पुणे लावणी महोत्सव-द्वितीय क्रमांक, राम कदम कलागौरव पुरस्कार, पुणे.शरदचंद्रजी पवार साहेब व सुरेश वाडकर यांचे हस्ते.

# नेप्ती उपबाजार समितीतील बोर्ड व कोनशिला

## अन्यथा अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

नेप्ती उपबाजार समिती येथील बोर्ड व कोनशिला हटविण्याबाबत उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाची अद्याप अंमलबजावणी न झाल्याने तक्रारदार अमोल येवले यांनी पणन संचालक तसेच जिल्हा उपनिबंधक यांना स्मरणपत्र पाठविले आहे. न्यायालयाने दिलेल्या मुदतीनंतरही संबंधित विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याचा आरोप या स्मरणपत्रात करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर अंतर्गत येणाऱ्या नेप्ती उपबाजार समिती परिसरातील बोर्ड व कोनशिला हटविण्याबाबत दि. ७ जानेवारी २०२६ रोजी न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले होते. या आदेशानुसार सहा आठवड्यांच्या आत संबंधित फलक व कोनशिला हटविणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यानुसार ही मुदत २१ फेब्रुवारी २०२६ रोजी संपुष्टात आली आहे. मात्र, मुदत संपूनही अद्याप संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याचे तक्रारदार अमोल येवले यांनी नमूद केले आहे. यामुळे न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी पाठविलेल्या स्मरणपत्रात नमूद केले आहे की, संबंधित बोर्ड व कोनशिला हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा, न्यायालयाचा अवमान केल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरोधात अवमान याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.




# प्रा. संजय धोपावकर यांचा नागरी सत्कार व क्रीडाधार स्मरणिकेचे प्रकाशन

## निस्वार्थ व समर्पण भावनेने क्रीडा क्षेत्रात नवीन पिढी घडविण्याचे प्रा.संजय धोपावकर यांचे भरीव योगदान- आमदार संग्राम जगताप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

क्रीडा क्षेत्रासाठी काम करीत असताना पदके व नोकरी मिळाली तर एवढ्यावर न थांबता निस्वार्थ व समर्पण भावनेने क्रीडा क्षेत्रात नवीन पिढी घडविण्यासाठी मोठ्या जिद्दीने काम करणारे प्रा. संजय धोपावकर यांच्या सारखी माणसे पुढच्या पिढीत मिळतील का? प्रा.संजय धोपावकर यांचा आदर्श घेऊन नवीन पिढी घडावी.

क्रीडा क्षेत्रातील गुरूंचा सन्मान करणारा हा कार्यक्रम शहराला दिशा देणारा आहे. प्रा.संजय धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा उल्लेख क्रीडाधार या स्मरणिकेत केलेला आहे.क्रीडा क्षेत्रातील धारेप्रमाणेच प्रा. धोपावकर यांचे कर्तुत्व शब्दात व्यक्त न करता येणारे असेच आहे.निस्वार्थ व समर्पण भावनेने क्रीडा क्षेत्रात नवीन पिढी घडविण्याचे प्रा.संजय धोपावकर यांचे भरीव योगदान आहे.असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.



सावेडी येथील माऊली सभागृह येथे प्रा.संजय धोपावकर यांचा सेवापूर्ती समारंभानिमित्त नागरी सत्कार करण्यात आला.तसेच श्री.धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा उल्लेख असलेली "क्रीडाधार" या स्मरणीकेचे प्रकाशन करताना आमदार संग्राम जगताप,आनंद लिमये (माजी अप्पर मुख्य सचिव गृहविभाग,सदस्य महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई), सौ.धनश्रीताई विखे पाटील, सौ.पद्मजा धोपावकर, महापौर सौ.ज्योतीताई गाडे,उपमहापौर धनंजय जाधव,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी,हिंद सेवा मंडळाचे संचालक सुमतीलाल कोठारी,उद्योगपती राजेंद्र चोपडा,धनंजय,विजय,अजय, अमोल,आदित्य धोपावकर, प्रा. संजय साठे आदींसह समस्त क्रीडारसिक परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद लिमये म्हणाले, प्रा.संजय धोपावकर यांच्या सेवानिवृत्ती व सत्कार समारंभ प्रसंगी उपस्थित राहण्याचा मला मान मिळाला याचा मला आनंद होत आहे. श्री. धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्राकडे व्यवसाय म्हणून कधीच बघितले नाही तर व्रतस्थ राहून क्रिडा क्षेत्रात अमूल्य असे योगदान दिले आहे. खऱ्या अर्थाने शासन दरबारी त्यांचा बहुमान होऊ शकला नाही. परंतु त्यापेक्षाही मोठा सत्कार आज शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू व क्रीडा प्रेमींनी केलेला सत्कार आहे.कृतज्ञतेची खरी पावती म्हणून शासन दरबारी श्री.धोपावकर यांचा सन्मान व्हावा.यासाठी अहिल्यानगर येथील सर्व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी प्रयत्न करावेत.

धनश्रीताई विखे म्हणाले, अहिल्यानगरच्या खेळाडूंना मोठे मोठे पुरस्कार मिळवून देण्याचे काम प्रा.संजय धोपावकर यांनी केले आहे.सध्या खेळाला पालकांकडून विशेष लक्ष दिले जात असल्याने अभ्यासा बरोबरच खेळ तेवढाच महत्त्वाचा आहे.या पुढील काळातही नगरच्या खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी मार्गदर्शन करावे.

आनंद भंडारी म्हणाले,प्रा. संजय धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात हजारो खेळाडूंना घडवून मोलाचे योगदान दिले आहे. शहराच्या क्रीडा क्षेत्रातील विकासासाठी योगदान द्यावे. यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करू. धनंजय जाधव म्हणाले,श्री शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू घडविणारे प्राध्यापक संजय धोपावकर यांना अर्जुन पुरस्कार मिळावा यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करू.सेवानिवृत्तीनंतर प्रा. संजय धोपावकर यांनी महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाची धुरा सांभाळावी. सचिन जगताप म्हणाले,श्री धोपावकर यांचे सारखे गुरु लाभले असताना १३ शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू अहिल्यानगर शहरात घडले आहेत.ज्याप्रमाणे पुण्याला विद्येचे माहेरघर म्हणतात त्याप्रमाणे

क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्र येऊन अहिल्यानगर ला खेळाचे माहेरघर करण्यासाठी एकत्रित येऊन पाऊल उचलावे.

यावेळी राजेंद्र चोपडा सुमतीलाल कोठारी यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी अनेक श्री शिवछत्रपती पुरस्कार विजेते,नवोदित खेळाडू, शहरातील क्रीडा रसिक,विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रिडाधार संपादक असिम शेख यांनी केले.सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले.तर आभार ऐश्वर्या कुलकर्णी यांनी मानले.

# सांस्कृतिक महोत्सव जल्लोषात साजरा

## अभिनेता दत्तू मोरे यांनी उलगडला हास्यजत्रे पर्यंतचा प्रवास

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

मी स्वत: ठाणे महानगरपालिकेच्या शाळा क्र. 111 चा माजी विद्यार्थी असून शाळेत असताना याच मंचावरुन मला प्रथम क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. शाळेच्या मंचावरुन सुरू झालेला हा प्रवास आज हास्यजत्राच्या मंचापर्यंत पोहचला आहे, त्यामुळे आज शाळेच्या व्यासपीठावरुन संवाद साधताना एक वेगळाच आनंद वाटत असल्याचे हास्यजत्रा फेम अभिनेता दत्तू मोरे यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी 'हास्यजत्रा' फेम अभिनेता म्हणून ओळख मिळेपर्यंत कसा झाला, याचा प्रेरणादायी प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडला. ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे आयोजित मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव 2025-2026 हा आज दि. 23 फेब्रुवारी 2026 रोजी गडकरी रंगायतन येथे उत्साहात व जल्लोषात पार पडला. यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, उपआयुक्त उमेश बिरारी, उपआयुक्त (शिक्षण) मिताली संचेती, नगरसेवक मनोहर डुंबरे, शिक्षणाधिकारी शेषराव बडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, दीपप्रज्वलन व नटराज पूजनाने झाली. या सांस्कृतिक स्पर्धांमध्ये एकूण 102 शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इयत्ता 1 ली ते 5 वी नृत्य विभाग, इयत्ता 6 वी ते 8 वी नृत्य विभाग तसेच इयत्ता 1 ली ते 8 वी नाट्य विभाग अशा विभागनिहाय स्पर्धा दि. 23 व 24 डिसेंबर रोजी पार पडल्या होत्या.

इयत्ता 1 ली ते 5 वी नृत्य विभाग: शाळा क्र. 53 – प्रथम क्रमांक, इयत्ता 6 वी ते 8 वी नृत्य विभाग: शाळा क्र. 59 – प्रथम क्रमांक, नाट्य विभाग: शाळा क्र. 11 – प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या कलागुणांना उत्तेजन देणारे मनोगत व्यक्त केले.



मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव समितीच्या अध्यक्षा सविता चौधरी, उपकार्याध्यक्षा नीलिमा पाटील, चिटणीस वर्षा मटकर, सहचिटणीस आशा पाटे, युआरसी प्रमुख रविंद्र पाटील, मुश्ताक पठाण व इतर पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी शेषराव बडे व गटाधिकारी संगीता बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. तसेच ठाणे जिल्हा शिक्षक सेनेचे अध्यक्ष सुनील फापाळे, ठाणे मनपा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष बाबाजी फापाळे, ठाणे जिल्हा शिक्षक पतपेढीचे संचालक जगन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाटील व वनिता जाधव यांनी प्रभावीपणे केले.

# पालघर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत बोराळा शाळेचा खो-खोमध्ये प्रथम क्रमांक

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

पालघर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या खो-खो स्पर्धेत जव्हार तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा बोराळा येथील संघाने प्रथम क्रमांक पटकावून तालुक्याचा मान उंचावला. संघाच्या उत्कृष्ट संघभावना, वेग आणि अचूक डावपेचांच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली.

स्पर्धेदरम्यान बोराळा शाळेच्या खेळाडूंनी सुरुवातीपासून आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. अंतिम सामन्यातही शिस्तबद्ध बचाव आणि चपळ आक्रमण यामुळे संघाने विजय निश्चित केला.

या यशाबद्दल सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि शिक्षकवृंद यांचे अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मुख्याध्यापक संतोष गवळी, सहशिक्षक सुरेश भोरे, प्रतिभा शेलार, मुकेश भोये, सोपान पाडवी आणि रोहन पाडवी उपस्थित होते. तसेच जामसर केंद्राचे केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी व इतर शिक्षकांनीही संघाचे कौतुक केले.



या यशामुळे शाळेसह जव्हार तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही अशाच प्रकारे उज्वल यश संपादन करण्याचा निर्धार संघाने व्यक्त केला.

# निसर्ग दाता ग्रंथास ग्रंथ साहित्य पुरस्कार




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पर्यावरण विषयाचे अभ्यासक, स्तंभलेखक व निरगुडसर गावचे पोलीस पाटील विठ्ठल वळसे पाटील लिखीत "निसर्ग दाता" या वैचारिक ग्रंथास पुणे येथे पार पडलेला राज्यस्तरीय शासकीय मराठी साहित्य संमेलन - २०२६ संमेलनात मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ साहित्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. नुकतेच पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर मध्ये पुणे महानगरपालिका, मराठी भाषा संवर्धन समिती, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधनी (यशदा) व संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय राज्यस्तरीय शासकीय मराठी साहित्य संमेलन - २०२६ पार पडले. या संमेलनात विविध लेखकांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. "ग्रंथ साहित्य पुरस्कार" महेश भागवत अतिरिक्त महासंचालक कायदा सुव्यवस्था तेलंगणा, सचिन इटकर क्षेत्रीय संचालक महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ, शेखर गायकवाड अतिरिक्त महासंचालक, डॉ. किरण धांडे यशदा प्रभारी अधिकारी, सुनील महाजन संवाद पुणे संचालक, व्यंकटेश कल्याणकर माध्यम व प्रकाशन विभाग यशदा या मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक, स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. निसर्ग दाता या पुस्तकाला विविध साहित्य संस्थांनी गौरविले आहे. लेखक वळसे पाटील हे गेली ३० वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात असून निसर्ग दाता या ग्रंथात पर्यावरण विषयक वैचारिक तत्वज्ञान मांडले आहे.

# महिला उद्योजकासाठी प्रदर्शन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ संचलित महिला मंडळच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला उद्योजकता वाढविण्यासाठी व महिला सक्षमीकरणासाठी महिलांनी महिलांसाठी प्रदर्शन आयोजित केले असून ज्यात छोट्या व्यावसायिकांना तसेच मध्यम व्यवसायिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देत आहोत अशी माहिती स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी दिली. दि. ७ मार्च २०२६ रोजी प्रदर्शन दिल्लीगेट अहिल्यानगर येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत सर्वासाठी खुले असणार आहे,यामध्ये विविध प्रकारचे सुमारे ३५ स्टोलचे नियोजन आहे.

# श्री क्षेत्र ओझर येथे ज्येष्ठ नागरिकांचा भव्य मेळावा

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांचा भव्य मेळावा शिवजयंतीचे औचित्य साधून श्री क्षेत्र ओझर येथील श्रीराम मंदिर सभागृहात उत्साहात पार पडला. तालुक्यातील विविध ज्येष्ठ नागरिक संघांचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यात दगडू मांडे यांच्या अध्यक्षतेखाली जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक संघ शिखर समितीची अधिकृत स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महासंघाचे सचिव मच्छिंद्र सरजिने यांनी नव्या कार्यकारिणीची घोषणा केली.

कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी किसन राम आरूटे, उपाध्यक्षपदी चंद्रकांत नामदेव डुंबरे, कोषाध्यक्षपदी किसन गंगाराम मेहेर, सचिवपदी बाबू लक्ष्मण मुळे, सहसचिवपदी रामदास माणिक पाटे यांची निवड करण्यात आली. कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून रामदास देवकर, निवृत्ती एरंडे, चंद्रकांत मस्करे, दत्तात्रेय कराळे, अनंता मांडवे, शंकर कचरे, तुकाराम औटी, शिवाजी गावडे, हरिभाऊ गुंजाळ, बेबी सरजिने, साधना चोरडिया, भिमाजी गोरे, दत्तात्रय सोमवंशी, मच्छिंद्र सरजिने व धोंडू तुकाराम रेंगडे यांचा समावेश आहे.



## ; शिखर समितीची स्थापना व कार्यकारिणी जाहीर

मेळाव्यात ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या संख्येच्या पार्श्वभूमीवर त्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. ग्रामीण भागातील अनेक ज्येष्ठ नागरिकांना कुटुंबाकडून पुरेसे आर्थिक पाठबळ मिळत नसल्याने शासनाने पेन्शन योजना प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच शासकीय सुविधांसाठी पात्रतेचे वय ६५ ऐवजी ६० वर्षे करण्याची मागणीही करण्यात आली.

तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनी पेन्शन योजनांसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज भरले असून ते लवकरच मंत्रालयात सादर करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन देण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला.

दरम्यान, शासनाने जाहीर केलेल्या योजनांची अंमलबजावणी न झाल्यास ज्येष्ठ नागरिकांचा भव्य मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# कालव्याचे आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी

- **कुकडी व पिंपळगाव जोडा डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या हितासाठी आ. दातेंचा पुढाकार**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी व ग्रामस्थांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन दोन महत्त्वपूर्ण निवेदने सादर केली. कुकडी डावा कालवा तसेच पिंपळगाव जोगा डावा कालवा आवर्तन तातडीने सोडण्याबाबत त्यांनी ठोस मागणी केली.

आमदार दाते सर यांनी दिलेल्या पत्रानुसार, कुकडी डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी तसेच ओलिताखालील पीक क्षेत्र व पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता आवर्तन दि. ०१ मार्च २०२६ रोजी सोडण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत मुख्य अभियंता, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे व अधिक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे यांना तातडीच्या सूचना देण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

तसेच पिंपळगाव जोगा डावा कालवा हा मतदारसंघातील अनेक गावांसाठी शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत असून सध्या पाणीपातळी खालावल्याने तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी आवर्तन सोडण्यात यावे, अशी मागणी दुसऱ्या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

शेतकरी हिताला प्राधान्य देत पाणी प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार दाते सर यांच्या या प्रयत्नांमुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. पिकांचे संरक्षण व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची सोय सुनिश्चित करण्यासाठी आमदार दाते सरांचा हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

> जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेबांनी निवेदनाची दखल घेत संबंधित प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ आवश्यक त्या सूचना देण्याचे आश्वासन देत केलेल्या मागणीचा विचार करत कुकडी डाव्या कालव्याद्वारे १ ते ५ मार्च दरम्यान तर २५ फेब्रुवारी ते १ मार्च च्या दरम्यान पिंपळगाव जोगा डाव्या कालव्याद्वारे पाणी सोडण्यात येईल असा विश्वास दिला आहे.
>
> **- आ. काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

# विष्णुपुरी शाळेला भेट

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

लातूर विभागात पिएम श्री योजने अंतर्गत प्रथम आलेल्या विष्णुपुरी जिल्हा परिषद शाळेस भारत सरकारचे सहसचिव डॉ.निधी पांडे व नांदेड जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांनी 24 फेब्रुवारी रोजी भेट देऊन पाहणी करून विध्यार्थी पालकांशी ,सुसंवाद साधला,व भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता बाबींचे निरीक्षण केले. पीएम पीएमश्री योजना ही एक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP-2020 च्या अंतर्गत सरकारी शाळांच्या दर्जा उंचवणारी केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत देशभरात 15,500 हून अधिक सरकारी शाळांना पीएम श्री शाळेच्या दर्जा प्राप्त झालेला आहे. या शाळा मॉडल शाळा म्हणून विकसित केल्या जात असून, डिजिटल शिक्षण,आधुनिक पायाभूत सुविधा, आणि सर्वांगीण विकासावर भर देऊन गुणवत्तेचे नेतृत्व करतात.

# शिवजयंती महोत्सव २०२६ विविध स्पर्धांत सर्वाधिक बक्षिसे मिळवून चैतन्याची बाजी

**ओतुर : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद, पुणे, पंचायत समिती,जुन्नर, सांस्कृतिक कार्य संचालनालय व तहसिल कार्यालय जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती महोत्सव १६ ते १८ फेब्रूवारी २०२६ या कालावधीत जुन्नर याठिकाणी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवून सर्वाधिक बक्षिसे ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरच्या विद्यार्थ्यांनी मिळविल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. शिवजयंती महोत्सवानिमित्त जुन्नर या ठिकाणी पुणे जिल्हा परिषद, पुणे, पंचायत समिती,जुन्नर, सांस्कृतिक कार्य संचालनालय व तहसिल कार्यालय जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला , निबंध,वक्तृत्व,गडचढण व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते. या विविध स्पर्धांत चैतन्य विद्यालय ओतूर मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या झालेल्या स्पर्धांत अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.




सर्व बक्षिस पात्र विद्यार्थ्यांना पंचायत समिती जुन्नरचे गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे ,केंद्र प्रमुख कमलाकांत मुंढे, यश मस्करे, सचिन मुळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह , प्रशस्तिपत्रक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे,रघूनाथ तांबे,प्रदीप गाढवे, पंकज घोलप, राजश्री भालेकर , संजय हिरे , अनिल उकिरडे , अजित डांगे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# पार्ले अ‍ॅग्रोचा 'स्मूध केसर बदाम' लाँच; भारतीय चवीची भर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील अग्रगण्य पेय उत्पादक कंपनी पार्ले अ‍ॅग्रोने आपल्या फ्लॅगशिप डेअरी ब्रँड 'स्मूध' अंतर्गत 'स्मूध केसर बदाम' हे नवे फ्लेवर्ड मिल्क बाजारात आणले आहे. बदामाची समृद्धता आणि केशरची ऊब यांचा मिलाफ असलेले हे पेय प्रीमियम आणि आल्हाददायक अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. स्मूधच्या फ्लेवर्ड मिल्क पोर्टफोलिओमध्ये नव्याने दाखल झालेल्या या उत्पादनामुळे ग्राहकांना पारंपरिक भारतीय चवीचा आधुनिक, ऑन-द-गो फॉरमॅटमध्ये आस्वाद घेता येणार आहे. सणावार, कुटुंबीयांची भेट किंवा दैनंदिन ताजेतवाने पेय म्हणून हा पर्याय योग्य ठरेल, असा कंपनीचा दावा आहे. हे उत्पादन ८० मि.ली. पॅकसाठी १० रुपये आणि




१५० मि.ली. पॅकसाठी २० रुपयांच्या किमतीत उपलब्ध आहे. पार्ले अ‍ॅग्रोच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक व सीएमओ नादिया चौहान म्हणाल्या, "स्मूध ब्रँडने सुरुवातीपासूनच डेअरी-आधारित पेये अधिक सुलभ करून या श्रेणीला नवे रूप दिले आहे. केसर बदाम हा सांस्कृतिक महत्त्व आणि व्यापक आकर्षण असलेला फ्लेवर असल्याने तो आमच्या पोर्टफोलिओमध्ये नैसर्गिक भर ठरला आहे. ग्राहकांच्या बदलत्या पसंतीनुसार पारंपरिक चवी आधुनिक स्वरूपात उपलब्ध करून देण्यावर आमचा भर आहे."

# आमदार डॉ. किरणजी लहामटे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

## ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लिंगदेव : (समर्थ गांवकरी)**

अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांच्या वाढदिवसानिमित्त लिंगदेव येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. भगवान लिंगेश्वर देवस्थान ट्रस्ट, ग्रामपंचायत कार्यालय लिंगदेव आणि ज्ञानगंगा वाचनालय लिंगदेव यांच्या संयुक्त विद्यमाने हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसानिमित्त औपचारिक कार्यक्रमांपेक्षा लोकांच्या आरोग्याची काळजी घेणारा उपक्रम राबविण्यात आल्याने सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा गावातच उपलब्ध व्हावी, या उद्देशाने विविध नामांकित रुग्णालयांचे सहकार्य घेण्यात आले. वरद हॉस्पिटल अकोले, मेडीकव्हर हॉस्पिटल संगमनेर, शिवसमर्थ हॉस्पिटल लिंगदेव तसेच तुलसी आय केअर हॉस्पिटल नाशिक यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी शिबिरात सहभाग नोंदविला. शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह तपासणी, हृदयविकार तपासणी, नेत्र तपासणी तसेच विविध आजारांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तुलसी आय केअर हॉस्पिटलच्या वतीने डोळ्यांची सखोल तपासणी करण्यात आली. दृष्टीदोष, चष्म्याचा नंबर,



डोळ्यांतील संसर्ग, ॲलर्जी आदी तक्रारींवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. अनेक ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला. विशेष म्हणजे शालेय विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र आरोग्य मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. किशोरवयीन मुलींनी महिलांच्या आरोग्याशी संबंधित समस्या, मासिक पाळीतील अडचणी, रक्ताल्पता, पोषण आणि वैयक्तिक स्वच्छता याबाबत निःसंकोचपणे प्रश्न विचारले. डॉ. प्रतिक्षा शिंदे (कानवडे) यांनी संवेदनशीलतेने त्यांच्या शंकांचे निरसन करून योग्य ते वैद्यकीय सल्ला दिला. ग्रामीण भागात अशा विषयांवर खुलेपणाने चर्चा होणे गरजेचे असून या सत्रामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढल्याचे शिक्षकांनी सांगितले.


डॉ. किरण कानवडे, डॉ. अमित सुर्वे, डॉ. अतुल पवार, डॉ. एकनाथ सानप, डॉ. पंकज नंदागवळी, डॉ. शेखर सोनवणे आणि डॉ. सचिन हाडवळे यांनी दिवसभर रुग्णांची तपासणी करून आवश्यक ते उपचार व मार्गदर्शन केले. लिंगदेव व परिसरातील ग्रामस्थांसह लिंगेश्वर आदर्श विद्यालय, श्री लिंगेश्वर हायस्कूल व आर. आर. कानवडे ज्युनिअर कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने शिबिराचा लाभ घेतला.

कार्यक्रमास देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष डी. बी. फापाळे, लिंगदेव ग्रामपंचायत सदस्या कल्पना हरिभाऊ फापाळे, विश्वस्त सदाशिव कानवडे गुरुजी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी कार्याध्यक्ष तथा विश्वस्त भगवान लिंगेश्वर देवस्थान हरिभाऊ फापाळे, विश्वस्त सुदाम हांडे, भाऊसाहेब पवार, ह.भ.प. परशुराम महाराज कानवडे, मुख्याध्यापक घुले, लांडगे, पर्यवेक्षक रवी चौधरी, प्रा. सतीश वाडेकर, प्रा. मंडलिक, वाळुंज, भाविक, युवक तालुका अध्यक्ष अक्षयजी आभाळे, उपसरपंच महिपाल देशमुख, युवा नेते मकरंद वाकचौरे, विकास वाकचौरे, जिजाबा कानवडे, व्यवस्थापक प्रवीण सोळसे आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार डॉ. लहामटे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरामुळे ग्रामीण भागातील शेकडो नागरिकांना मोफत व तज्ज्ञ आरोग्यसेवेचा लाभ मिळाला.

# कंधारमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

■ गहू,ज्वारी, हरभरा व फळ बागायतीचे मोठे नुकसान



कंधार : (समर्थ गांवकरी) परवा 23 फेब्रुवारी रोजी दुपारी चार ते पाचच्या दरम्यान कंधार तालुक्यामध्ये जोरदार अवकाळी पाऊस वाऱ्यामुळे अनेक भागात शेतशिवारातील पिके आडवी झाली, तर शेतातील काढणीला आलेला हरभरा, ज्वारीसह कडबाही भिजला. शेतकऱ्यांनी कडबा तसेच काढणी केलेले पीक झाकण्यासाठी तारांबळ उडाली होती. काही भागात वाऱ्याचा कैऱ्यांनाही तडाखा बसला आहे.

वादळी वाऱ्यामुळे कौठा परिसरातील तीन पोल पडले होते सुदैवाने यामध्ये जीवितहानी टळली. तालुक्यातील शिवारातील आंब्यालाही फटका बसला, अनेक झाडांखाली कैऱ्यांचाही सडा पडला होता. तब्बल पाच मिनिटे वेगवान वारे व पंधरा मिनिटे पडलेल्या पावसामुळे चिंच,पेरू,जांभळ,ज्वारी,गहूसह शेतशिवारातील काढून ठेवलेल्या पिकांच्या बनमी उडाल्या,भिजल्या. पिके आडवी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. याबाबत पंचनामे करून भरपाई द्यावी,अशी शेतकऱ्यांतून मागणी केली जात आहे.

दिवसभर उन्हाचा तडाखा बसत असताना सोमवारी तीनच्या नंतर वातावरणात बदल झाला. त्यात ढगही दाटून आले. काही भागात सायंकाळी चार पाचच्या दरम्यानपावसाने हजेरी लावली. त्यामुळे काही वेळ वातावरणात गारवा पसरला होता. कंधारसह तालुक्यातील जवळपास सर्वच परिसरातील गावांत सायंकाळी पाच वाजता पावसाचा शिडकावा झाला. कंधार शहराचा बाजार अचानकपणे वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने भाजीपाले व्यापारी,शेतकरी आणि ग्राहकांसह शहरवासीयांची चांगलीच तारांबळ उडाली. तर बोरी (बु) येथील शेतकरी ज्ञानेश्वर बोरकर यांच्या गहू आणि केशर आंब्याचे मोठे नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस किंवा गारपीट झाल्यास, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने त्वरित नुकसानग्रस्त भागाची पाहणी,पंचनामा (कृषी,महसूल,ग्रामपंचायत संयुक्त), पीक विमा कंपनीला ४८ तासांत सूचना, आणि बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व मार्गदर्शनासाठी तातडीची भूमिका बजावणे आवश्यक आहे.



ठाणे : ठाणे जिल्ह्याच्या पत्रकारितेला राज्याचा 'आरोग्य रत्न' सन्मान, आरोग्य जनजागृती आणि सार्वजनिक आरोग्य विषयांवरील सातत्यपूर्ण, अभ्यासपूर्ण व समाजाभिमुख लेखनासाठी ठाणे जिल्ह्याचे ज्येष्ठ पत्रकार प्रशांत रविंद्र सिनकर यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. मुंबई येथे पार पडलेल्या समारंभात सन्मानचिन्ह, मानपत्र आणि रोख पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. २६ वर्षांच्या जबाबदार पत्रकारितेची ही राज्यस्तरीय दखल मानली जात आहे.

**(फोटो - संतोष पडवळ)**

## थोडक्यात बातम्या...

### जेईई मेन्स परिक्षेत सर्वेश लोणे चमकला



अर्धापूर (स. गांवकरी) : नुकत्याच जाहिर झालेल्या जेईई मेन्स २०२६ (सेशन १) परिक्षेच्या निकालात लहान येथील सर्वेश महेंद्र लोणे ९७.९२ परसेंटाइल मिळवून नेत्रदीपक यश संपादन केले. या यशाबद्दल जैन ईंटरनेशनल स्कुलचे प्राध्यापकांनी सर्वेश लोणे यांच्या व आई-वडील सत्कार केला. गाव लहान पण किर्ती महान सर्वेशच्या या यशाने लहान गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तसेच इयत्ता दहावीच्या आयसीएससी बोर्डात ९४% मिळवून सीडीएस स्कूल, येथून घवघवीत यश संपादन केलेले आहे. कालकथित ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य प्रा. दु. मो. लोणे यांचा नातू असून, त्याचे वडील मदर डेअरी येथे गुणनियंत्रण विभाग प्रमुख आहेत. सातत्यपूर्ण अभ्यास घरच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे, जेईई मेन्स च्या परिक्षेत यश संपादन केले आहे, त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### ई-पीक पाहणीतील सहाय्यक स्तरावरील कामकाजाला टाळाटाळ?

किनवट (स. गांवकरी) : रब्बी हंगाम 2025-26 साठी ई-पीक पाहणी (Digital Crop Survey – DCS) मोबाईल अँपद्वारे पीक नोंदणी प्रक्रिया राज्यभर सुरू असताना सहाय्यक (तलाठी) स्तरावरील कामकाजात काही ठिकाणी विलंब होत असल्याची बाब पुढे येत आहे. सहाय्यक स्तरावरील पीक पडताळणी व नोंद दुरुस्तीची अंतिम मुदत १० मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली असली, तरी काही तालुक्यांत अद्याप अपेक्षित गतीने काम होत नसल्याची चर्चा आहे. महाराष्ट्र शासनच्या महसूल व वन विभागांतर्गत भूमि अभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार रब्बी हंगामासाठी ई-पीक पाहणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानुसार शेतकरी स्तरावरील नोंदणी २४ जानेवारी २०२६ रोजी पूर्ण झाली असून, सहाय्यक स्तरावरील कालावधी २५ जानेवारी २०२६ ते १० मार्च २०२६ असा निश्चित आहे. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात १०० टक्के पीक पाहणी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी मंडळ अधिकाऱ्यांनी मोबाईल अँप लॉगिनद्वारे दुरुस्त्या करून निश्चित कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी MIS प्रणालीद्वारे नियमित आढावा घेऊन प्रलंबित तालुक्यांमध्ये विशेष मोहीम राबवावी, असेही निर्देश आहेत. मात्र प्रत्यक्ष परिस्थितीत काही भागांत सहाय्यकांकडून पीक पडताळणी व नोंदींच्या दुरुस्तीमध्ये टाळाटाळ होत असल्याची तक्रार शेतकरी व्यक्त करत आहेत. काही गावांमध्ये शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करूनही सहाय्यक स्तरावर पडताळणी प्रलंबित असल्याने नोंदी अद्याप अंतिम झालेल्या नाहीत.

### मुखेडमध्ये वादळी वाऱ्या सह अवकाळी पावसाची जोरदार हजेरी

मुखेड (स. गांवकरी) : काल दुपारी चार ते पाचच्या दरम्यान मुखेड तालुक्यामध्ये जोरदार वादळ सुरू होऊन अवकाळी पावसाने कहरच माजवला. सुदैवाने यामध्ये जीवितहानी टळली मात्र पिकासहित झाडे, लाईटचे पोल पडून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल आहे. अचानक पणे आलेल्या वाऱ्या वादळा मध्ये कुणाची घरावरची पत्र उडून गेली, तर कुणाच्या शेतीचे अतोनात नुकसान झाल्याची घटना दि. 23 फेब्रुवारी रोजी मुखेड तालुक्यात घडली. दरम्यान सोमवारचा मुखेडचा आठवडी बाजार भरला होता. मात्र अवकाळी पावसामुळे ते विस्कळीत होऊन, बरंच काही नुकसान झाल्याची कबुली येथील शेतकरी व व्यापाऱ्याने प्रसार माध्यमाला दिली आहे. तसेच विजेचा कडकडाटसह जोरदार वाऱ्यामुळे विद्युत तार व झाड तुटून, तहसील कार्यालयाच्या बाजूला उभी केलेल्या दुचाकीवर पडल्यामुळे, येथील परिसरात नुकसान झाल्याचे समजते. त्याचबरोबर बाजारातील खाऊक वस्तूचं सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाल आहे. शेतामधील पिकासोबतच चिंच, आंबा, पेरू, जांभळ, ज्वारी, गहू, हरभरा, व इतर पिकाचं काही प्रमाणात नुकसान झालं असून याची भरपाई शासन देईल का?असे मत मुखेड तालुक्यातील शेतकरी बांधवांनी व्यक्त केल आहे.

### २८ला शासकीय सेवांचा भव्य महामेळावा

भोकर (स. गांवकरी) : शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी मिळवून देण्याच्या उद्देशाने २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजता भोकर येथे शासकीय सेवांचा भव्य महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. आरोग्य तपासणी शिबिर, विविध शासकीय योजनांची माहिती, मार्गदर्शन व तत्काळ सेवा देणारे स्टॉल या महामेळाव्यात उभारण्यात येणार असल्याने तालुक्यातील नागरिकांसाठी ही मोठी संधी ठरणार आहे. सदर मेळावा राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली यांच्या निर्देशानुसार तसेच महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सूचनेनुसार प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन,तसेच तालुका विधी सेवा समिती भोकर आणि वकील अभिवक्ता संघ भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. सदरील कार्यक्रम भोकर येथील हनुमान नगर, खुले मैदान, किनवट रोड येथे होणार असून नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या महामेळाव्यात आरोग्य शिबिरासह शासनाच्या विविध योजनांचे माहिती व सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिक, ग्रामस्थ व लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे तसेच भोकर तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम आणि वकील अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. परमेश्वर पांचाळ यांनी केले आहे.

## जय मल्हार विद्यालय इमारत बांधकाम प्रगतीपथावर

### उर्वरित बांधकामासाठी निधीची आवश्यकता



अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी) पिंपळगाव रोठा .ता.पारनेर येथील जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्थेचे जय मल्हार विद्यालय च्या नवीन इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असुन ३ मजली इमारतीचे सिमेंट प्लास्टर पर्यंतचे काम झाले आहे.बाकी राहीलेल्या कामांमध्ये इमारतीचे प्लंबिंग, इलेक्ट्रिक फिटींग, लादीकाम, पाणी व्यवस्था पाण्याची टाकी, सॅनिटरी फिटींग, दरवाजे खिडक्या,शटर, इमारतीचे गेट, सवरक्षण भिंत, खेळाचे मैदान, आणि मुख्य प्रवेशद्वार कमान इत्यादी कामांसाठी अजून निधी ५० लाख रुपये पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. विद्यालयाचे माजी विद्यार्थी, माजी विद्यार्थ्यांनी, कर्मचारी वृंद, पालकवर्ग, ग्रामस्थ, मुंबईकर पुणेकर मंडळी तसेच इतर देणगीदार यांनी पुन्हा यथाशक्ती देणगी देऊन इमारत बांधकामासाठी मदत करावी.सदर देणगी आयकर कलम इन्कम टॅक्स (80G) खाली करसवलत प्राप्त आहे. त्याचा देखील देणगीदारांना लाभ घेता येईल. सन २०२६ च्या जुन महिन्याच्या अगोदर शाळा इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याचे संस्थेचे व जय मल्हार विद्यालयाचे उद्दिष्ट आहे. त्याचवेळी शाळेच्या भव्यदिव्य इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न करण्यात येणार आहे. संस्थेचे बचत खाते नंबर -5414747333 सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया असे असुन अधिक माहितीसाठी संस्थेचे सचिव अँड.पांडुरंग विठ्ठल गायकवाड. मो. नंबर 9822620142 आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम सुंबरे सर मो.नंबर 9623808055 यांच्याशी संपर्क साधावा. शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सन २०२३ मध्ये शाळा इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. आत्ता पर्यंत अंदाजे एक कोटी रुपये पर्यंतचा खर्च शाळा बांधकामावर खर्च झालेला आहे. थोर समाजरत्न दानशूर शेठ डॉ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या संस्थेच्या माध्यमातून १०० ब्रास लादी इमारत बांधकामामध्ये दान रुपात मिळणार आहे. महाशिवरात्रीच्या पावन पवित्र काळात शेठ नानजीभाई ठक्कर यांनी प्रत्यक्ष विद्यालयाला भेट देऊन शाळेच्या नवीन इमारत बांधकामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. आणि समाजातील दानशूर दातृत्व असणाऱ्या देणगीदारांनी उर्वरित शाळेच्या राहीलेल्या कामांसाठी मदत करावी असे आवाहन केले.

## प्रोटोकॉल आणि परंपरेच्या भंगावरून राजकीय वातावरण तापले

डांग गुजरात : (समर्थ गांवकरी) ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या डांग दरबार-2026 च्या आयोजनावरून डांग जिल्ह्यात राजकीय वादंग निर्माण झाला आहे. प्रोटोकॉलचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत डांग जिल्हा काँग्रेस अध्यक्ष स्नेहल ठाकरे यांनी प्रशासन आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. दरवर्षी परंपरेनुसार या गौरवशाली दरबाराचे उद्घाटन राज्याचे प्रथम नागरिक असलेल्या राज्यपालांच्या हस्ते केले जाते. मात्र, यावर्षी 26 फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या डांग दरबार 2026 च्या अधिकृत पत्रिकेनुसार उद्घाटन सोहळा जिल्ह्याचे प्रभारी मंत्री जयरामभाई गामित यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. राज्यपालांना 3 मार्च रोजी होणाऱ्या समारोप समारंभात 'अतिथी विशेष' म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. या निर्णयावर आक्षेप घेत स्नेहल ठाकरे यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसिद्ध करत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी म्हटले की, घटनात्मक प्रोटोकॉलनुसार राज्यपालांचे पद मंत्र्यांपेक्षा उच्च आणि अधिक मानाचे आहे. राज्यपाल कार्यक्रमास उपस्थित असताना त्यांच्या ऐवजी मंत्र्यांकडून उद्घाटन करून घेणे हे केवळ प्रोटोकॉलचे उल्लंघन नसून राज्याच्या सर्वोच्च घटनात्मक पदाचा अपमान आहे. त्यांनी पुढे आरोप केला की, मंत्र्यांना प्रसिद्धी मिळावी म्हणून सरकार डांगच्या अनेक वर्षांच्या परंपरांमध्ये हस्तक्षेप करत आहे. डांग दरबार हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून डांगच्या पाच राजघराण्यांच्या सन्मानाशी आणि आदिवासी अस्मितेशी निगडित ऐतिहासिक सोहळा आहे.

## समूहाच्या नेतृत्वाची जबाबदारी खासदार श्रीकांत शिंदे यांना



ठाणे : (समर्थ गांवकरी) आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करणे ही नेहमीच अभिमानाची बाब असते. भारत–इंडोनेशिया नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आल्याबद्दल कल्याण लोकसभेचे शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आपल्या एक्स पोस्टद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिरला तसेच संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांचे मनःपूर्वक आभार मानले. खासदार डॉ. शिंदे पुढे म्हणाले की हा माझ्यासाठी, माझ्या पक्षासाठी आणि महाराष्ट्रातील सर्व नागरिकांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. अशा मंचांमुळे भारताचे कूटनीतिक हित अधिक बळकट होतील तसेच आपल्या लोकशाही, संसदीय आणि जनतेतील परस्पर संबंधांना अधिक दृढता मिळेल. प्रतिनिधीमंडळातील विविध राजकीय पक्षांच्या सर्व खासदारांसह एकत्रितपणे भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी ते सक्रियपणे कार्य करतील. हा पुढाकार दोन्ही देशांमधील परस्पर सहकार्याला नवी गती देईल तसेच भारताची जागतिक उपस्थिती अधिक सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. या मैत्री समूहांतर्गत खासदार शिंदे यांच्याकडे इंडोनेशियाशी संबंधित संसदीय मैत्री समूहाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. ३९ वर्षीय श्रीकांत शिंदे हे या प्रतिनिधीमंडळातील सर्वात तरुण नेते असतील, जे आंतरराष्ट्रीय मंचावर भारताच्या नव्या आणि ऊर्जावान राजकीय पिढीचे प्रतिनिधित्व करतील. डॉ. श्रीकांत शिंदे हे शिवसेनेचे तीन वेळा निवडून आलेले युवा खासदार आणि संसदीय पक्षनेते आहेत. लोकसभेत महाराष्ट्राशी संबंधित प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात ते सातत्याने सक्रिय राहिले आहेत.

## शिवकालीन युगात स्त्रियांना मिळणारा सन्मान आजही मिळाला पाहिजे : कु. पवार

■ डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत शिवजयंती निमित्त व्याख्यान



अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी) छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आपणास जीवनामध्ये योग्य ते मार्गदर्शन करते, तसेच जीवनात यश मिळवण्यासाठी आपण त्यांचे गुण अंगीकारावे, शिवकालीन युगामध्ये स्त्रियांना जो सन्मान मिळत होता तो सन्मान आजकालच्या परिस्थितीतही मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे.

प्रत्येक स्त्रीला मातेसमान मानले पाहिजे, हे आपण शिवरायांच्या विचारातून आत्मसात केले पाहिजे. शिवरायांनी कधीही स्वतःचा मोठेपणा सिद्ध न करता आपल्या कार्यात स्वतःला वाहून घेऊन रयतेचे राज्य निर्माण केले आपणही स्वार्थीपणा सोडून समाजाच्या हिताचे कार्य करावे,असे आवाहन शिवचरित्र व्याख्याते कुमारी कार्तिकी पवार यांनी केले आहे.

विळद घाट येथील डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवजयंतीचा कार्यक्रम जल्लोषात संपन्न झाला. यावेळी शिवचरित्र व्याख्याते कुमारी कार्तिकी पवार यांचे व्याख्यान संपन्न झाले.यावेळी कार्तिकी व कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ.अजित लावरे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. यावेळी सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी लेझिम, दंडपट्टा, भाषणे, सादर केली.आयोजन करण्यात आले होते.काही मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज,राणी सईबाई, राजमाता जिजाऊ, मावळे यांच्या शिवकालीन वेशभूषा परिधान केली.हे या कार्यकमाचे प्रमुख आकर्षण ठरले. तसेच विद्यार्थ्यांनी शिवकालीन युध्दकलेचे प्रात्यक्षिक दाखविले. कुमारी पवार यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले कि शिवरायांच्या स्वराज्य निर्मीतीच्या कार्यात सर्व धर्माचे लोक सहभागी होते.यातून त्यांनी सर्वधर्म समभावाची वागणूक दिली. छत्रपती शिवाजी महाराजांकडून आपण सूक्ष्म नियोजन, कटिबध्दता, संयम, दक्षता तसेच तत्परता, चातुर्य या आणि अशा गुणांचे आपण अवलंबन केले तर आपणही आपल्या जीवनाचा आलेख वाढता ठेवू शकतो. असे त्यांनी स्पष्ट केले.

शिवजयंती उत्सवाचे नियोजन शिक्षक समन्वयक प्रा.सुनिल मांढरे, श्री.राम पठारे, प्रा.गणेश डहाणे, प्रा. अविनाश पुंड, प्रा.डी.बी.ठाणगे, प्रा. एन.ए.पोंधे, प्रा.भारत तागड, डॉ. प्रतिभा गायके, सौ.सुनंदा गुंजाळ, श्री.आर.बी.शेलार, परमेश्वर तौर, राज देशमुख, गायत्री नांगरे, सारीका तौर, वैष्णवी गायके, अनुपमा कहांडळ यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी सहभाग घेतला. यावेळी तनुजा गायकवाड या विद्यार्थीनीने शिवरायांचा पोवाडा सादर केला व शिवनृत्य संस्कृति अनसूल, दंडपट्टा श्रेया गिते आदींनी सादर केले. सूत्रसंचालन कु.स्नेहा अहिरे, अथर्व अजबे यांनी केले तर आभार प्रा.सुनिल मांढरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.श्री.सुनिल कल्हापुरे, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील, डायरेक्टर जनरल डॉ.पी.एम.गायकवाड यांनी या उपकमाचे कौतुक केले.

## निर्व्यसनी मुल ही त्या कुटुंबाची खरी श्रीमंती- आ. डॉ. किरण लहामटे

### आढळवाडी शाळेचे सांस्कृतीक कार्यक्रम उत्साहात संपन्न




राजूर : (समर्थ गांवकरी) गरिबीतून श्रीमंत होण्यासाठी एकच मार्ग आहे,तो म्हणजे शिक्षण घेणे होय. त्यातूनच संस्कारक्षम पिढी निर्माण होते.मुलांना त्यांच्या कलागुणांना वाव दया.समाजातील विविध उपक्रमांमध्ये जरूर भाग घ्या. परंतू हे सर्व करत असताना निर्व्यसनी रहा.कारण निर्व्यसनी मुल ही त्या कुटुंबाची खरी श्रीमंती आहे. असे प्रतिपादन आमदार डॉ.किरणजी लहामटे यांनी केले.

तालुक्यातील पिंपळगाव नाकविंदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढळवाडी येथे विविध गुणदर्शन व सांस्कृतीक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी आ.डॉ.किरण लहामटे विचारमंच्यावरून बोलत होते.

यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच लक्ष्मण सोंगाळ हे अध्यक्ष होते.

यावेळी माजी उपसरपंच तथा तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बबनराव आभाळे,महालक्ष्मी विद्यालयाचे प्राचार्य सुनिल धुमाळ,सदस्य चिमण मेंगाळ, नवनाथ जाधव, माजी सदस्य वाळीबा लगड,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश बगनर, उदयोजक सचिन सदगीर,वाळू पथवे,गोरख आभाळे, गणपत आभाळे, सुभाष बगनर, पंढरीनाथ पोपेरे, भाऊपाटील बगनर,इजि. ऋषिकेश लगड,मारूती आभाळे,राम लगड, रामभाऊ आढळ,संदिप लगड, संतोष लगड, किरण बेणके,विशाल तातळे,संदिप तातळे,मनीष आढळ, पांडू आढळ,गोरख आढळ,किसन आढळ, बहिरू आढळ,भास्कर गावंडे,विठ्ठल आढळ, लक्ष्मण आढळ,आरूण आढळ,आरूण मधे, आविनाश गावंडे यांसह तालुक्यातील शैक्षणीक क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

शिक्षणातून खरी प्रगती साध्य होते.योग्य वयात मिळालेले संस्कार विदयार्थ्याला योग्य मार्गाला घेऊन जातात. म्हणूनच सुप्त कला गुणांना वाव देने गरजेचे असून दरवर्षी विविध कलागुणांचे आयोजन केले जाते.धैर्य आणि आत्मविश्वास ही यशाची किल्ली आहेत.यातून योग्य वयात चांगले व्यासपीठ निर्माण होते. **- मुख्याध्यापक पोपट चौधरी**

बालकलाकारांनी देशभक्तीपर गीत,शेतकरी नृत्य,आदिवासी नृत्य,खंडोबाची कारभारीन, आम्ही शिव कन्या, पिंगळा महाद्वारी,आपलीच हवा,लावणी,मराठी, हिंदी रिमिक्स गाण्यांवर ठेका धरत उपस्थितांची मने जिंकली.

प्रेक्षकांनीही आर्थिक स्वरूपात देणगी देऊन बालकलाकारांचे चांगलेच कौतूक केले.

दैनिक समर्थ गांवकरी यांच्याकडून देण्यात आलेले घडयाळ व दिनदर्शिकाचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तावीक मुख्याध्यापक पोपट चौधरी यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.सचिन लगड व ह.भ.प.ऋतुजाताई बगनर यांनी केले. तर सहशिक्षक कचरू बेनके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)